11 NOV 2024
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘कलम ३७५’, ‘पिंडग्रान’ एकांकिका अव्वल

## पुरुषोत्तम करंडक स्पर्धा; २० महाविद्यालयीन संघांचा सहभाग

■ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत सर्वोत्कृष्ट एकांकिकेचे सांघिक गटात प्रथम आलेला डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या ‘पिंडग्रान’ एकांकिकेचा संघ.

कोल्हापूर, ता. १० : कलोपासक पुणे यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत सर्वोत्कृष्ट एकांकिकेचे पारितोषिक शहाजी विधी महाविद्यालयाच्या ‘कलम ३७५’ या एकांकिकेची, तर सांघिक गटात डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या ‘पिंडग्रान’ या एकांकिकेची निवड झाली. पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय अंतिम फेरीत या एकांकिका सादर होतील. ज्येष्ठ रंगकर्मी संजय हळदीकर, उमा नामजोशी यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली.

कलोपासक पुणे, गायन समाज देवल क्लब, शिवाजी विद्यापीठ संगीत नाट्यशास्त्र विभाग यांच्या सहयोगाने पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा गोविंदराव टेंबे रंगमंदिरात घेण्यात आली. कोल्हापूर, सांगली, सातारा येथील २० महाविद्यालयीन संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला.

उत्तेजनार्थ अभिनय - नेहा सावंत (शिवाजी विद्यापीठ), अथर्व होगाडे (दत्ताजीराव कदम इन्स्टिट्यूट, इचलकरंजी), श्रेया माने (राजारामबापू अभियांत्रिकी कॉलेज, साखराळे), मानसी बोळुदे (शहाजी लॉ कॉलेज), मनोज्ञा हुदार चिंतामणराव व्यापार महाविद्यालय यांना मिळाले.

अभिनय नैपुण्य अभिनेता, अभिनेत्री - प्रायोगिक एकांकिका शहाजी विधी महाविद्यालयाच्या ‘कलम ३७५’ या एकांकिकेचे गंधार जोग, रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेजच्या ‘म्हातारी’ या एकांकिकेसाठी अक्षता बारटक्के यांनी पारितोषिके मिळाली.

सांघिक एकांकिकेसाठी डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ‘पिंडग्रान’ एकांकिकेसाठी समर्थ तपकिरे, शिवाजी विद्यापीठातील ‘बांध’ एकांकिकेसाठी द्रुप्ता कुलकर्णी, सर्वोत्कृष्ट विद्यार्थी लेखक - म्हणून गंधार जोग व विद्यार्थी दिग्दर्शक अभिषेक हिरेमठ यांनी बक्षिसे पटकावली.

रंगकर्मी दिलीप बापट, पवन खेबुडकर, डॉ. संजीवकुमार पाटील, देवल क्लब संचालक सुबोद गद्रे, अजित कुलकर्णी, कविता घाटगे, अनंत निघोजकर, डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण झाले.

11 NOV 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेत 'पिंडग्रान' एकांकिका प्रथम

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूर पुण्यातील केंद्र महाराष्ट्रीय कलोपासक, कोल्हापुरातील गायन समाज देवल क्लब आणि शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ८ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर या कालावधीत पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धा गायन समाज देवल क्लबमधील गोविंदराव टेंबे रंगमंदिर येथे झाल्या. या स्पर्धेत कोल्हापुरातील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजीच्या 'पिंडग्रान" या एकांकिकेने प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र देवून गौरवण्यात आले.

पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेसाठी कोल्हापूर शहरातील तसेच इचलकरंजी, सांगली, सातारा, इस्लामपूर, बेळगाव आदी भागांतील २० महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. व्दितीय क्रमांक कोल्हापुरातील देशभक्त रत्नाप्पा

- **रोख पारितोषिकासह प्रमाणपत्र देवून विजेत्यांचा सन्मान**

कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सच्या 'यात्रा" एकांकिकेने, तृतीय साखराळे येथील राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'वे नॉट" एकांकिकेने मिळवला. तर प्रायोगिक करंडक कोल्हापुरातील शहाजी लॉ कॉलेजच्या 'कलम ३७५" या एकांकिकेने पटकावला. अभिनय नैपुण्य अभिनेता एकांकिका 'कलम ३७५ ≫ गंधार जोग, अभिनय नैपुण्य अभिनेत्री एकांकिका 'यात्रा" अक्षता बारटक्के यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देवून गौरवण्यात आले. सर्वोत्कृष्ट अभिनय नैपुण्य एकांकिका 'पिंडग्रान" समर्थ तपकिरे, सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनय एकांकिका 'बांध" तृप्ती कुलकर्णी, उत्तेजनार्थ अभिनय प्रमाणपत्रे शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागाच्या 'बांध" एकांकिकेतील भूमिकेसाठी नेहा सावंत, दत्ताजीराव कदम आर्ट, सायन्स ॲन्ड कॉमर्स कॉलेजच्या 'माई" एकांकिकेतील अथर्व होगाडे,



**कोल्हापूर : पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षिस स्वीकारताना डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजीच्या 'पिंडग्रान' एकांकिकेतील कलाकार.**

साखराळे येथील राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'वे नॉट" एकांकिकेतील श्रेया माने, शहाजी लॉ कॉलेजच्या 'कलम ३७३' एकांकीकेतील मानसी बोळुरे, सांगली येथील चिंतामणराव व्यापार महाविद्यालयाच्या 'मानस' एकांकिकेतील मनोज्ञा हुद्दार या स्पर्धेचा बक्षिस वितरण सोहळा नाट्य प्रशिक्षक संजय हळदीकर यांच्या हस्ते झाला.स्पर्धेचे परीक्षण दिलीप बापट, पवन खेबुडकर आणि पुण्यातील डॉ. संजीवकुमार पाटील यांनी केले. यावेळी कोल्हापूरचे नाट्य शाखा प्रमुख उमा नामजोशी, संचालक सुबोध गद्रे, संचालिका कविता घाटगे, संचालक अजित कुलकर्णी महाराष्ट्रिय कलोपासकचे अध्यक्ष अनंत नियोजकर, विश्वस्त शंकर उणेचा, चिटणीस राजन ठाकूर-देसाई, शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे डॉ. विनोद ठाकुर-देसाई, स्पर्धेचे समन्वयक अनुपम दामाडे, यांच्यासह कोल्हापुरातील रंगकर्मी मोठ्या संख्येने उपस्थित होते.